# उद्योगवार्ता

## अजिंक्य रहाणे महिंद्राचे पाठबळ असलेल्या मेरा किसानमध्ये गुंतवणूक करणार




मेरा किसान प्रायव्हेट लि. या २०.७ अब्ज डॉलर उलाढालीच्या महिंद्रा समूहाचा भाग असणाऱ्या आणि नाविन्यपूर्ण सेंद्रीय अन्न पुरवठा साखळीवर अधिक भर देत सेंद्रीय शेती व्यवसायामध्ये आघाडीवर असणाऱ्या कंपनीने भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे उपकप्तान अजिंक्य रहाणे यांच्याशी भागीदारी केल्याचे आज जाहीर केले आहे.

शेतकरी कुटुंबातले असणारे आणि शेतकऱ्यांना भरघोस पाठिंबा देणारे अजिंक्य यांनी आरोग्यविषयी अधिकाधिक जागरूक होत असलेल्या भारतीय ग्राहकांसाठी सुरक्षित, ट्रेसेबल व आरोग्यदायी सेंद्रीय अन्नाचा वापर करणाऱ्या नव्या युगाचे स्वागत करण्यासाठी मेरा किसानशी सहयोग केला आहे. या भागीदारीचा भाग म्हणून, अजिंक्य यांनी गुंतवणूक केली आहे आणि मेरा किसानमध्ये इक्विटी खरेदी करणार आहे. तसेच कंपनीचे ब्रँड अम्बेसिडरही असणार आहेत. मेरा किसानचा जो गाभा आहे, त्याप्रमाणे अत्याधुनिक सेंद्रीय शेती पद्धतीचा अवलंब करून भारतीय शेतकऱ्यांची शाश्वत भरभराट होण्यासाठी हातभार लावणे, हे त्यांचे उद्दिष्ट आहे. मेरा किसानशी असलेल्या सहयोगाबद्दल बोलताना, भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे उपकप्तान अजिंक्य रहाणे यांनी सांगितले, ''मेरा किसान यासारख्या आधुनिक, शाश्वत सेंद्रीय शेती व्यवसाया बरोबर सहयोग करणे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. सेंद्रीय पद्धतीने पिकवलेले अन्न वेलनासाठी योगदान देते आणि आमचे उद्दिष्ट सामायिक असल्याने ही भागीदारी अतिशय महत्वाची आहे. तसेच शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती पद्धतीद्वारे या शाश्वत भरभराटीकडे जाणाऱ्या वाटचालीचा एक भाग बनविण्यासाठी मी उत्सुक आहे.''

मेरा किसान प्रा. लि. चे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत पाटील यांनी सांगितले की, ''आरोग्यदायी जगण्यासाठी उत्तेजन देणे, हे मेरा किसानचे उद्दिष्ट आहे. आम्ही जपतो ती मूल्ये जपणारे आणि या महत्वाच्या विषयाची आवड असणारे अजिंक्य यांच्याशी सहयोग करणे, हा आमचा सन्मान आहे. शेतीच्या शाश्वत पद्धती अवलंबल्या जातील आणि ग्राहकांसाठी अत्यंत दर्जेदार कृषी उत्पादने घेतली जातील, याची दक्षता घेण्यासाठी आम्ही शेतकऱ्यांबरोबर काम करतो. अजिंक्य यांच्या सहयोगाने आम्ही आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी, तसेच भविष्याच्या दृष्टीने सेंद्रीय अन्नाची संस्कृती रूजवण्यासाठी चालना देऊ शकू, अशी अपेक्षा आहे.''